**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यासाठी उद्या मतदान /राज्यातल्या ११ मतदारसंघांमधे मतदानासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज

- आपण आहेत तोपर्यंत नागरिकत्व सुधारणा कायदा रद्द करण किंवा धर्माच्या आधारावर आरक्षण देणं कुणालाही शक्य लसल्याची प्रधानमंत्री नरेंद्र  मोदी यांची स्पष्टोक्ती

- काँग्रेसनं देशाला स्वातंत्र्य मिळवून दिलं, भाजपानं देशासाठी काय केलं, असा काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांचा सवाल

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत चेन्नई सुपर किंग्जचा राजस्थान रॉयल्सवर ५ गडी राखून विजय

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातलं मतदान उद्या होणार असून त्यादृष्टीनं निवडणूक आणि प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे. देशभरात एक लाख ९२ हजार मतदान केंद्र असून त्यासाठी १९ लाखाहून जास्त कर्मचारी तैनात आहेत. केंद्रांवर पिण्याचं पाणी, स्वच्छतागृहं, आवश्यक तिथे सावलीसाठी मांडव, चाकाच्या खुर्च्या, स्वयंसेवक, अविरत वीजपुरवठा इत्यादी सुविधा उपलब्ध आहेत. ज्येष्ठ तसंच दिव्यांग मतदारांसाठीही मदतीची सुविधा उपलब्ध आहे.

मतदानाला सकाळी ७ वाजता सुरुवात होईल आणि ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत चालेल.

या टप्प्यात नऊ राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या मिळून ९६ मतदारसंघांचा समावेश आहे. आंध्र प्रदेशात सर्व २५, तेलंगणात सर्व १७,उत्तरप्रदेशात १३, मध्यप्रदेश आणि पश्चिम बंगालमधे प्रत्येकी ८ बिहारमधे ५, झारखंड आणि ओदिशामधे प्रत्येकी ४ ठिकाणी मतदान होणार असून जम्मू काश्मीरच्या केंद्रशासित प्रदेशात एका मतदारसंघात मतदान होईल. देशभरात ७१ कोटी ७० लाखाहून जास्त मतदार असून १ हजार ७१७ उमेदवार नशीब आजमावत आहेत. या टप्प्यात गिरिराज सिंह, अर्जुन मुंडा, जी किशन रेड्डी, अजय कुमार मिश्रा हे केंद्रीय मंत्री तसंच समाजवादी पार्टीचे अखिलेश यादव, जेडीयु चे राजीव रंजन सिंग, तृणमूल काँग्रेसच्या महुआ मोईत्रा, आणि शत्रुघ्न सिन्हा, काँग्रेसचे अधीररंजन चौधरी, एआयएमआयएम चे असदुद्दीन ओवेसी अशा मातब्बर उमेदवारांचं भवितव्य ठरणार आहे.

आंध्रप्रदेशातल्या विधानसभेच्या सर्व जागा आणि ओदिशा विधानसभेच्या पहिल्या टप्प्यातल्या २८ जागांसाठी देखील उद्या मतदान होणार आहे.

**<><><><><>**

जोपर्यंत मोदी आहेत तोपर्यंत कोणीही नागरिकत्व सुधारणा कायदा रद्द करू शकत नाही किंवा धर्माच्या आधारावर आरक्षण देऊ शकत नाही, असं प्रधानमंत्री मोदी यांनी पश्चिम बंगालमध्ये बराकपूर इथल्या सभेत बोलताना सांगितलं. त्यांनी पाच प्रकारच्या गॅरंटीचं आश्वासन उपस्थितांना दिलं. युवा वर्गाच्या हाती विकसित भारत देण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचं त्यांनी हुगळी इथल्या सभेत स्पष्ट केलं. चारशेहून अधिक जागा जिंकणं ही आता केवळ भाजपाची घोषणा राहिली

नसून देशातल्या कोट्यवधी जनतेचा संकल्प बनला असल्याचं ते म्हणाले. सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ आज सर्वसामान्य जनतेला होत आहे, असं त्यांनी सोदाहरण स्पष्ट केलं. दुसरीकडे तृणमूल काँग्रेस पक्ष जनतेची लूट करत आहे, असा आरोप त्यांनी केला.

**<><><><>**

आपल्या सरकारनं गेल्या दहा वर्षांमध्ये गरिबांना सक्षम करण्यावर तसंच त्यांच्यासाठी रोजगाराच्या संधी निर्माण करण्यावर भर दिल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रत्येक नागरिकाला सक्षम केल्यानं आणि त्यांना यशस्वी होण्यासाठी लागणारी साधनं उपलब्ध करून दिल्यानं खराखुरा विकास घडून येतो, हे भारतानं जगाला दाखवून दिलं आहे, असं त्यांनी एका इंग्रजी दैनिकाला दिलेल्या मुलाखतीत सांगितलं. गेल्या दहा वर्षात २५ कोटी जनता गरिबीतून बाहेर आल्याचं ते म्हणाले.

भारतातलं बेरोजगारांचं प्रमाण जगात सर्वात कमी असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. कोट्यवधी नागरिकांनी स्वतःचा व्यवसाय सुरु करण्यासाठी मुद्रा कर्जाचा लाभ घेतला, हे पहिल्यांदाच घडलं आहे. आपल्या सरकारनं मजबूत अर्थव्यवस्था उभारली असून त्यामुळे भारताच्या आगामी २५ वर्षांचा पाया घडला आहे, असंही ते म्हणाले.

**<><><><>**

काँग्रेस पक्ष देशासाठी लढला. महात्मा गांधींच्या खांद्याला खांदा लावून काँग्रेसने देशाला स्वातंत्र्य मिळवून दिलं. भाजपाने देशासाठी काय केलं, असा प्रश्न विचारत काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी भाजपावर टीकास्त्र सोडलं. धुळे इथं महाविकास आघाडीच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ आयोजित सभेत

आज खर्गे बोलत होते. नरेंद्र मोदी चारशे पारचा नारा देतात. पण, त्यांना देशभरातून चाळीस जागा मिळणंही अवघड आहे, असंही खर्गे म्हणाले.

२०१५ सालीच भाजपाने संविधान बदलण्याचं जाहीर केलं होतं. संविधान बदललं तर दलित, मागास, गोरगरीबांचे आरक्षण आणि मूलभूत हक्क हिरावले जातील. भाजपाचा हा डाव यशस्वी होऊ द्यायचा नसेल तर इंडिया आघाडीचं सरकार सत्तेत आणा, असं आवाहन खर्गे यांनी केलं.

**<><><><><>**

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज चेन्नई इथं झालेल्या सामन्यात सुपर किंग्जनं राजस्थान रॉयल्सवर ५ गडी राखून विजय मिळवला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना राजस्थान रॉयल्सला निर्धारीत २० षटकांत ५ बाद १४१ धावांचीच मजल मारता आली. त्यानंतर विजयासाठी १४२ धावांचं आव्हान चेन्नईनं सामन्यातले १० चेंडू बाकी असतानाच पूर्ण केलं.

स्पर्धेतला आजचा दुसरा सामना बंगळुरु इथं रॉयल्स चॅलेंजर्स बंगळुरु आणि दिल्ली कॅपीटल्स यांच्यात सुरु आहे. दिल्ली कॅपीटल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा रॉयल्स चॅलेंजर्स बंगळुरुच्या ८ षटकात २ बाद ८७ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

सत्तेत आल्यावर कॉंग्रेस काश्मीरचं ३७० कलम परत लागू करेल, असा आरोप भाजपाचे नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज केला. उत्तर प्रदेशातल्या प्रतापगढ इथं भाजप उमेदवाराच्या प्रचारार्थ आयोजित सभेत ते बोलत होते. भाजपाने ३७० कलम हटवलं. पण, कॉंग्रेसला हे पचत नाही, अशी टीका शाह

यांनी केली. निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात भाजपा दोनशे पार गेली आहे. चौथ्या टप्प्यात अडीचशे पार जाईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. कौशम्बी लोकसभा मतदारसंघातले भाजपाचे उमेदवार विनोद सोनकर यांना निवडून देण्याचं आवाहनही शाह यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

ही निवडणूक साधारण निवडणूक नसून भारताचा आत्मा सुरक्षित ठेवण्यासाठीचा संघर्ष आहे. भाजपानं लोकशाही, संविधान धोक्यात आणलं आहे, विविधतेला खुलेआमपणे छेद दिला आहे, असा आरोप काँग्रेसचे वरिष्ठ नेते, माजी केंद्रीय मंत्री शशी थरूर यांनी आज केला. ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. जनतेचे ज्वलंत प्रश्न टाळून बिनमहत्वाच्या मुद्द्यावरच भाजपा आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी बोलत आहेत, अशी टीका त्यांनी केली.

महाराष्ट्रात महाविकास आघाडीतल्या पक्षांमध्ये योग्य समन्वय असल्याची पावती थरूर यांनी दिली. ४ जूनला दिल्लीतून भाजपाचं सरकार जाऊन इंडिया आघाडीचं सरकार येईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

समाजातल्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचा विचार करून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मत्स्य संपदा योजनेसह अनेक योजना राबवल्या. येत्या काळात अशा अनेक योजनांची अंमलबजावणी केली जाईल, अशी ग्वाही उत्तर मुंबई लोकसभा मतदासंघांतले भाजपा उमेदवार केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी दिली. गोयल यांच्या नमो यात्रेला आज मालाड इथल्या जरीमरी मंदिर इथून प्रारंभ झाला. या यात्रेत त्यांनी भाटी कोळीवाडा इथं कोळी बांधवांच्या समस्या जाणून घेतल्या आणि मत्स्य योजनेचा लाभ घ्यायला सांगितलं.

<><><><><>

उत्तर प्रदेशात समाजवादी पक्षानं आज लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या आणि सातव्या टप्प्यासाठी आपल्या उमेदवारांची आणखी एक यादी जाहीर केली. सपानं मिर्झापूरसाठी रमेश बिंद यांना तिकीट दिलं आहे. पक्षानं यापूर्वी मिर्झापूरमधून राजेंद्र बिंद यांच्या उमेदवारीची घोषणा केली होती, मात्र भदोही इथले भाजपाचे खासदार रमेश बिंद यांनी समाजवादी पक्षात प्रवेश केल्यानंतर अखिलेश यादव यांनी त्यांना उमेदवारी दिली आहे. रमेश बिंद यांची लढत आता राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या उमेदवार अनुप्रिया पटेल यांच्याशी होणार आहे. सपानं रॉबर्टगंज लोकसभा मतदारसंघासाठी छोटालाल खारवार यांना तिकीट दिलं आहे. भाजपानं या दोन्ही जागा आघाडीचा घटक पक्ष अपना दलला दिल्या आहेत.

<><><><><>

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्याच्या प्रचारासाठी भाजपा नेते अमित शाह उद्या वसईत येत आहेत. पालघर लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार डॉ. हेमंत विष्णु सावरा यांच्यासाठी ते प्रचारसभा घेतील. वसईतल्या सनसिटी मैदानावर दुपारनंतर त्यांची सभा होईल, असं भाजपाचे वसई विरारचे प्रचार प्रमुख मनोज बारोट यांनी सांगितलं.

<><><><><>

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमात उद्याच्या भागात आपण 'वायव्य मुंबई' लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

//<><><><><>//